**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २९९ । शनिवार २९ ऑगस्ट २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# सात ठिकाणी छाप्यांत तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

## एलसीबीच्या कारवाईत १४ जणांवर गुन्हे दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**





**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने एमआयडीसी, जामखेड व बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच दिवशी ७ विविध ठिकाणी छापे टाकून तब्बल २ लाख ९९ हजार ९९० रुपयांचा साठा जप्त केला. या कारवाईत १४ आरोपींविरुद्ध ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदारांची तीन विशेष पथके तयार केली होती. दिनांक २८ ऑगस्ट रोजी या पथकांनी गुप्त माहितीच्या आधारे एमआयडीसी, जामखेड आणि बेलवंडी परिसरात छापे टाकले.

छाप्यादरम्यान पोलिसांनी एमआयडीसी हद्दीतून १ लाख ६२ हजार ६०० रुपये, जामखेड हद्दीतून १ लाख १३ हजार ७७४ रुपये आणि बेलवंडी हद्दीतून २३ हजार ६१६ रुपयांचा पानमसाला व सुगंधी तंबाखू जप्त केली.

या कारवाईत प्रवीण पंडित, गणेश गोरे, विशाल वटाणे, वृषभ पोते, योगेश मोहोळकर, युवराज कोल्हे आणि विजय वाघमोडे यांना निष्पन्न करण्यात आले. तर आसिफ तांबोळी (शेवगाव), आप्पा कुमटकर (राजेगाव), सचिन जाधव (कडा) व अनिकेत सोनवणे यांच्यासह फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

# शिर्डीतील भगिनींचे विखेंसोबत रक्षाबंधन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शिर्डी–** भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा आणि आनंदाचा सण असलेला रक्षाबंधन काल सर्वत्र उत्साहात साजरा झाला. याच पार्श्वभूमीवर शिर्डीमध्ये एका आगळ्या-वेगळ्या रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. शिर्डी मतदारसंघातील असंख्य महिला भगिनींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे युवानेते डॉ. सुजय विखे पाटील यांना शिर्डीतील महिलांनी राखी बांधून त्यांच्या उदंड आयुष्यासाठी प्रार्थना केली.

शिर्डी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई थोरात, सर्व महिला नगरसेविका आणि शिर्डीतील असंख्य महिला भगिनींनी एकत्र येत डॉ. सुजय विखे पाटील यांना राखी बांधली. तसेच, परंपरेनुसार त्यांचे औक्षण करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

मतदारसंघातील प्रत्येक सुख-दुःखात एका भावासारखे खंबीरपणे पाठीशी उभे राहणाऱ्या आपल्या लाडक्या नेत्याप्रती उपस्थित सर्व महिलांनी यातून कृतज्ञता व्यक्त केली. या विशेष सोहळ्यासाठी शिर्डीचे उपनगराध्यक्ष अभय भैय्या शेळके, सर्व सन्माननीय नगरसेवक आणि परिसरातील प्रतिष्ठित ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# तरुणाला जीवे मारण्याची धमकी; एकावर गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जुन्या वादातून तरुणाला जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी भिंगार पोलीस ठाण्यात सतीश उर्फ नाना ज्ञानेश्वर मोरे (रा. सौरभनगर, भिंगार) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हे दिनांक २४ ऑगस्ट रोजी दुपारी पत्नीसह बेलेश्वर मंदिरात दर्शनासाठी गेले होते. दर्शनझाल्यानंतर, ''तू माझ्या पत्नीला मेसेज का करतोस?'' असा जाब विचारल्यावरून आरोपीने त्यांना दमदाटी करत जीवे मारण्याची धमकी दिली.







## दै. आकर्षण निवडक

### शनिवारपासून निमगाव वाघात श्रीमद् भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा



अहिल्यानगर- भगवान श्रीकृष्ण व श्री ज्ञानोबाराय जन्मोत्सवानिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे श्रीमद् भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गावातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात शनिवार, दि. २९ ऑगस्टपासून या धार्मिक सोहळ्याला प्रारंभ होणार असून, सप्ताहाच्या माध्यमातून भाविकांना अध्यात्म, भक्ती, ज्ञान आणि संस्कारांची पर्वणी अनुभवता येणार आहे. या सप्ताहात ह.भ.प. सौ. रत्नप्रभा दीदी काळे विविध धार्मिक व आध्यात्मिक विषयांवर श्रीमद् भागवत कथा निरूपण करणार आहेत. त्यांच्या रसाळ वाणीतील कथाकथनातून भगवान श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंग, भक्तीचे महत्त्व तसेच धर्म, नीती आणि संस्कारांचे विवेचन करण्यात येणार आहे. या सोहळ्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी दिली. कथा सप्ताहादरम्यान दररोज पहाटेपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे ४ ते ६ या वेळेत काकडा, सकाळी ७ ते ८ विष्णुसहस्रनाम, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ आणि सायंकाळी ७ ते ९ श्रीमद् भागवत कथा होणार आहे. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे सप्ताहाच्या काळात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात पहाटेपासून रात्रीपर्यंत भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमाला साथसंगत म्हणून सिंथवादक व गायक ह.भ.प. छगन महाराज मोकाटे, ह.भ.प. दीपक महाराज बनकर, तबलासाथ ह.भ.प. आप्पा म. काळे, ह.भ.प. वैष्णवी ताई कोल्हे तसेच पॅडवादक ह.भ.प. संतोष महाराज सुबे यांची साथ लाभणार आहे. शनिवार, दि. २९ ऑगस्ट : श्रीमद् भागवत महात्म्य व गोकर्ण उपाख्यान, रविवार, दि. ३० ऑगस्ट : नारदपूर्व चरित्र, परीक्षित जन्म व सृष्टी वर्णन, सोमवार, दि. ३१ ऑगस्ट : ध्रुव चरित्र, प्रल्हाद चरित्र, वराह अवतार व नृसिंह अवतार, मंगळवार, दि. १ सप्टेंबर : समुद्रमंथन, वामन अवतार व श्रीकृष्ण जन्म, बुधवार, दि. २ सप्टेंबर : भगवान श्रीकृष्ण बाललीला व गोवर्धन लीला, गुरुवार, दि. ३ सप्टेंबर : रुक्मिणी स्वयंवर व सुदामा चरित्र कथेचा समावेश आहे. या कथामालेच्या माध्यमातून भगवान विष्णूंच्या विविध अवतारांचे महत्त्व, भक्तांच्या श्रद्धेची शक्ती, भक्तीमार्ग, श्रीकृष्णाच्या बाललीला तसेच भक्त-संतांच्या जीवनातील आदर्श यांचे भावपूर्ण विवेचन करण्यात येणार आहे. शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ह.भ.प. शंकर महाराज गणगे यांचे कीर्तन होणार आहे. श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या निमित्ताने मंदिर परिसरात विशेष उत्साहाचे वातावरण राहणार असून, मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. धनंजय महाराज उदावंत यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. या कीर्तनाने सप्ताहाची सांगता भक्तिमय वातावरणात होणार आहे. श्रीमद् भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण, काकडा, विष्णुसहस्रनाम, हरिपाठ, कीर्तन आणि महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांनी निमगाव वाघा येथे भक्तीचा जागर होणार आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील अधिकाधिक भाविकांनी घ्यावा, असे आवाहन निमगाव वाघा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### ‘तिरंगा केवळ कार्यालयावर नको, अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीत उतरवा!’

अहिल्यानगर - नागरिकांच्या करातून वेतन घेऊनही जनतेची कामे वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवणाऱ्या, कायद्याच्या राज्याऐवजी मनमानीला प्राधान्य देणाऱ्या आणि निर्णयांची जबाबदारी टाळणाऱ्या प्रशासकीय प्रवृत्तीविरोधात पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान अनेक वर्षांपासून रखडलेल्या नगर-मनमाड महामार्गाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी या महामार्गाला प्रतीकात्मक स्वरूपात ‘नितीन गडकरी अनागोंदी (नगर-मनमाड) राष्ट्रीय महामार्ग’ असे नामकरण करण्यात आले. कर्तव्यनिष्ठा, शिस्त, निर्णयक्षमता आणि लोकाभिमुख प्रशासनाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कार्यशैलीचा आदर्श प्रशासनासमोर ठेवत त्यांच्या कर्तव्यनिष्ठेला प्रतीकात्मक ‘तिरंगा राष्ट्रीय धारणालय सलाम’ अर्पण करण्यात आला. प्रशासनातील प्रत्येक पद हे अधिकार गाजविण्याचे सिंहासन नसून जनतेच्या सेवेसाठी असलेले उत्तरदायी साधन आहे,

## ‘गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला बळ देणार’ - अतुल डागा

### श्री समर्थ विद्यामंदिरात गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक सांगळेगल्ली विभागातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना निरंजन सेवाभावी संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याबरोबरच त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती व सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. यावेळी निरंजन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अतुल डागा, श्री. राहुल झंवर, श्री. दिनेश भाटिया, श्री. पियुष झंवर, प्राथमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, स्वप्नील कुलकर्णी, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनील कानडे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. अजय महाजन यांच्यासह शिक्षक, संस्थेचे सदस्य व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलताना निरंजन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अतुल डागा म्हणाले की, ‘‘समाजातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या गरजवंत आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या शिक्षणात आर्थिक अडचण अडथळा ठरू नये, हा आमच्या संस्थेचा मुख्य उद्देश आहे. अनेक विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, बुद्धिमत्ता आणि पुढे जाण्याची जिद्द असते; मात्र केवळ आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध होत नाही. अशा विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन त्यांचे शिक्षण सुलभ करण्याचे काम निरंजन सेवाभावी संस्था सातत्याने करीत आहे. गरजू विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला बळ देणे, हीच खरी समाजसेवा आहे.’’

विद्यार्थ्यांना आज दिलेले शैक्षणिक साहित्य हे केवळ वस्तूंचे वाटप नसून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली गुंतवणूक आहे. या साहित्याचा योग्य प्रकारे उपयोग करून विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास करावा, मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. आज मदत घेणारा विद्यार्थी उद्या सक्षम झाल्यानंतर समाजातील दुसऱ्या गरजू विद्यार्थ्याला मदतीचा हात देईल, अशी सेवाभावाची साखळी निर्माण व्हावी, ही आमची अपेक्षा आहे. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःचे, कुटुंबाचे आणि समाजाचे भविष्य घडवू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करून उत्तम शिक्षण घ्यावे,’’ असेही अतुल डागा यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे सेक्रेटरी श्री. सुरेश क्षीरसागर यांनी निरंजन सेवाभावी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानत त्यांच्या शैक्षणिक साहित्य वाटपाच्या उपक्रमाचे कौतुक केले. गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा ओळखून त्यांना मदत करण्याचे कार्य निश्चितच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी, ‘‘तुम्हाला मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा चांगल्या प्रकारे उपयोग करा, मन लावून अभ्यास करा आणि जीवनात मोठे ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी प्रयत्न करा,’’ असे आवाहन केले.

## बँकेच्या प्रगतीमध्ये सभासदांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा – जयंत काकतकर

### अहमदनगर शहर सहकारी बँकेत सभासद प्रशिक्षण वर्ग उत्साहात संपन्न
### सहकाराची सात तत्त्वे, सभासदांची भूमिका व अधिकारांवर मार्गदर्शन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** कुठल्याही संस्थेच्या प्रगतीमध्ये त्या संस्थेच्या सभासदांचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक असते. सभासद हा केवळ संस्थेच्या नफ्यातील भागीदार नसून, तो संस्थेचा मार्गदर्शक म्हणूनही काम करू शकतो, असे प्रतिपादन पुण्यातील तज्ञ व्याख्याते जयंत काकतकर यांनी केले.

अहिल्यानगर येथील अहमदनगर शहर सहकारी बँक लिमिटेड यांच्या वतीने सभासदांसाठी आयोजित सभासद प्रशिक्षण वर्गात ते बोलत होते. प्रा. मुकुंद घैसास सभागृहात ‘सहकारी बँकेच्या सभासदांची भूमिका व जबाबदारी’ या विषयावर प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन बँकेचे चेअरमन सीए. गिरीश घैसास, व्हाईस चेअरमन प्रा. माणिकराव विधाते, व्याख्याते जयंत काकतकर, संचालक अशोक कानडे, संचालिका रेश्माताई आठरे, संचालक निखिल नहार, संचालक प्रदीपकुमार जाधव आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी चेअरमन सीए. गिरीश घैसास यांच्या हस्ते प्रशिक्षणाचे व्याख्याते जयंत काकतकर यांचा सन्मान करण्यात आला.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिनेश लोखंडे यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. बँकेचे सभासद अद्ययावत असावेत, संस्थेच्या प्रगतीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असावा तसेच सभासदांना आपल्या जबाबदारीची जाणीव असावी, या उद्देशाने प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी प्रास्ताविकात सांगितले. बँकेचे चेअरमन सीए. गिरीश घैसास यांनी आपल्या मनोगतात संचालकांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळासंदर्भात माध्यमांमध्ये सुरू असलेली चर्चा आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती याबाबत सभासदांना थोडक्यात माहिती दिली.

पुण्यातील जनता सहकारी बँकेचे सेवानिवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी जयंत काकतकर यांनी आपल्या ओघवत्या व सोप्या शैलीत उपस्थित सभासदांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान त्यांनी सहकाराची सात तत्त्वे उदाहरणांसह समजावून सांगितली. विशिष्ट समाजातील व्यक्तींनी संस्था स्थापन केली असली तरी इतर कोणत्याही समाजातील व्यक्ती त्या संस्थेची सभासद होऊ शकते. सभासदत्व देताना वर्ग, लिंग, जात, धर्म अशा कोणत्याही प्रकारचा भेदभाव करता येत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

कमीत कमी रकमेचे शेअर्स धारण करणाऱ्या आणि जास्तीत जास्त रकमेचे शेअर्स धारण करणाऱ्या सभासदाला संस्थेने ठरवलेल्या पोटनियमांच्या अधीन राहून समान अधिकार असतात, याबाबतही त्यांनी माहिती दिली.

सभासदांनी निवडून दिलेले सदस्यच संचालक म्हणून काम करू शकतात. तज्ञ संचालक नियुक्त करण्याची तरतूद असली तरी संस्थेच्या निर्णयप्रक्रियेत ते आपले मत व्यक्त करू शकतात; मात्र संचालक मंडळाच्या सभेमध्ये त्यांना मतदानाचा अधिकार नसतो. ते केवळ सल्लागार म्हणून काम करू शकतात, अशा विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर काकतकर यांनी मार्गदर्शन केले.

## दुष्काळावर मात करत चिंचाळ्यातील शेतकऱ्याची केळी थेट दुबईच्या बाजारात!

### पैठण तालुक्यातील माऊली पाटील खैरे यांचा यशस्वी प्रयोग; गुणवत्तापूर्ण केळीला मिळाली आंतरराष्ट्रीय बाजारपेठ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण तालुक्यातील चिंचाळा येथील शेतकरी माऊली पाटील खैरे यांनी दुष्काळी परिस्थितीवर मात करत घेतलेल्या केळी पिकाला थेट दुबईच्या बाजारपेठेची वाट मिळाली आहे. त्यांच्या शेतातील गुणवत्तापूर्ण केळीची थेट दुबई मार्केटमध्ये विक्री झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

पाण्याची कमतरता आणि प्रतिकूल परिस्थिती असतानाही आधुनिक तंत्रज्ञान, योग्य नियोजन व मेहनतीच्या जोरावर त्यांनी केळीचे दर्जेदार उत्पादन घेतले. स्थानिक बाजारपेठेपुरते मर्यादित न राहता उत्पादनाला थेट आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळाल्याने पैठणच्या शेतकऱ्यांच्या शेतीमालाला परदेशी बाजारपेठेची नवी दारे खुली होत असल्याचे चित्र आहे.




माऊली पाटील खैरे यांच्या या यशाचे परिसरातून कौतुक होत असून, इतर शेतकऱ्यांसाठीही हा प्रयोग प्रेरणादायी ठरत आहे.

## गुरुकुलच्या विद्यार्थिनींनी पोलिस बांधवांना बांधली राखी; पैठण पोलिस ठाण्यात रक्षाबंधनाचा स्नेहसोहळा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वाचे औचित्य साधून गुरुकुल इंग्लिश स्कूल, पैठण येथील विद्यार्थिनी व शिक्षकवृंदाने पैठण पोलिस ठाण्यात पोलीस बांधवांसोबत रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा केला. विद्यार्थिनींनी पोलिसांना राखी बांधून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या उपक्रमातून पोलीस आणि विद्यार्थ्यांमधील स्नेह, विश्वास तसेच सामाजिक बांधिलकीचे नाते अधिक दृढ झाले. यावेळी पोलिस बांधवांनी विद्यार्थिनींना पोलीस ठाण्याचे दैनंदिन कामकाज, पोलिसांच्या विविध जबाबदाऱ्या आणि शस्त्रांविषयी प्राथमिक माहिती दिली.

महिला व मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाच्या महिला हेल्पलाईन, आपत्कालीन मदत क्रमांक, महिला विषयक कायदे तसेच उपलब्ध कायदेशीर मदतीबाबतही विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थिनींनी पोलिसांशी संवाद साधत विविध प्रश्न विचारले. पोलिसांनी त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत कायदेविषयक जागरूकता आणि सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढण्यासोबतच कायद्याची माहिती आणि सुरक्षिततेबाबतची जाणीव निर्माण झाली. रक्षाबंधनाच्या माध्यमातून पोलीस-नागरिक संबंध अधिक घट्ट करण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला. कार्यक्रमास पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्यासह पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. गुरुकुल इंग्लिश स्कूलच्या श्रीमती अश्विनी लखमले, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.

## आखेगाव येथे हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त मुस्लिम बांधवाकडून शैक्षणिक साहित्य व पुस्तकांचे वाटप



(छाया : बाबा पालवे)

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शेवगाव–** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आखेगाव येथे हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त आखेगाव येथील मुस्लिम बांधवाकडून विद्यार्थ्यांना विविध शालेय उपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले.

शालेय साहित्य यामध्ये विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांची पुस्तके त्याचबरोबर वह्या, पेन, लेखन साहित्य पॅड,पेन्सिल त्याचबरोबर खेळाचे साहित्य यामध्ये बॅट-बॉल,खेळणी,फुटबॉल त्याचबरोबर खाऊच्या स्वरूपामध्ये मिठाई यांचे वाटप करण्यात आले.

हा कार्यक्रम आखेगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रागणात सकाळी आठ वाजता पार पडला, यावेळी गावातील मुस्लिम बांधवांनी इतर खर्चाला फाटा देऊन सर्व उपक्रम साजरा केला, व एक आदर्श ठेवला, कार्यक्रमा वेळी उपस्थितांमध्ये शंकरराव काटे तालुका उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (श.पा गट), पंचायत समिती सदस्य कृष्णा (गंगा) शेठ पायघन, गणेश काटे, शंकर नाचन, निळकंठ काटे, लक्ष्मण गवळी, राहुल डोंगरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भारत काटे,सुरेश गोर्डे,संदीप गोर्डे त्याचबरोबर गावातील मुस्लिम बांधव जाकिरभाई पठाण, मुन्नाभाई शेख, शब्बीर शेख, साजिद शेख, आयुब शेख, जमीर शेख, वाजिद शेख, रेहान शेख, शोएब शेख, मस्तान शेख, इस्राईल पठाण, आसिफ शेख, यावेळी शाळेचे मुख्याध्यापक महादेव कंठाळी सर, जालिंदर भिसे सर, विद्या गायकवाड मॅडम,आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीकांत शिंदाडे यांनी करून विद्यार्थीना मो.पैगंबर यांची विषयी माहिती सांगितली, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महादेव कंठाळी सर यांनी केले.

## सिइटी आणि नीट परीक्षा केंद्रांबाबत सुधारणा करण्यात याव्यात मनसेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

### अन्यथा मनसे तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडणार – मनसे शहर उपाध्यक्ष तुषार हिरवे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्यात घेतल्या जाणाऱ्या सीईटी आणि नीट परीक्षा अत्यंत महत्त्वाची समजली जाते. सदर परीक्षेसाठी विद्यार्थी खूप अभ्यास करतात. सीईटी आणि नीट परीक्षेवर मुलांचे पुढील इंजीनियरिंग आणि मेडिकल कॉलेजची प्रवेश प्रक्रिया अवलंबून आहे.

राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांचा मिनिट आणि मिनिट अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रत्येक विद्यार्थी त्यासाठी कठोर मेहनत घेतात. परंतु या सिइटी आणि नीट परीक्षेचे परीक्षा केंद्र ही त्यांच्या शहरात व गावापासून सरासरी ६० ते ८० किलोमीटर असलेल्या दुसऱ्या ठिकाणी असतात. परीक्षेच्या दोन तास आधी सदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे लागते. परीक्षा केंद्रावर पोहचण्यासाठी एका गावावरून दुसऱ्या गावाला जाण्यासाठी एसटी बसेस तसेच खाजगी वाहने यांची जुळवाजुळव करताना विद्यार्थी व पालकांची ससेहोलपट होते. त्यात परीक्षा केंद्रावर ती वेळेत पोहोचले नाही तर ते विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहतात त्यामुळे त्यांचे वर्ष वाया जाऊन शैक्षणिक नुकसान होते. परीक्षा देता न आल्या कारणाने काही विद्यार्थी नैराश्यात जाऊन आत्महत्या करण्याचे प्रकार देखील घडू शकतात.

मनसेच्या वतीने सिइटी () आणि नीट () परीक्षा केंद्रांबाबत निवासी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन डफळ,शहर अध्यक्ष गजेंद्र राशीनकर विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड ,शहर उपाध्यक्ष तुषार हिरवे ,संकेत व्यवहारे ,शहराध्यक्ष सहकार सेना गणेश शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना शहर उपाध्यक्ष तुषार हिरवे म्हणाले कि गावागावातून विद्यार्थी सीईटी व नीट परीक्षांचे क्लासेसची मोठ्या प्रमाणात फी भरून व शहरात वर्षभर भाडेतत्त्वावर रूम घेऊन राहुन आधीच सदर पालकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. त्यात विद्यार्थ्याला परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी वेगळे असे आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

## रक्षाबंधन हा कुटुंब संस्थेला एकत्र बांधणारा धागा; कांबळे डॉ.पाऊलबुधे शैक्षणिक संकुलाच्यावतीने मतिमंद मुलांना शैक्षणिक मदत

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** आजचा रक्षाबंधन हे प्रेम,आपुलकी आणि माणुसकीचे दर्शन घडविणारा उत्सव आहे. यामुळे नात्यांमध्ये प्रेम विश्वास आणि आपुलकी निर्माण होते. रक्षाबंधन हा कुटुंब संस्थेला एकत्र बांधणारा धागा असल्याने आज राखी बांधण्याचा सण मतिमंद मुलांच्या निवासी शाळेत साजरा करून निरागस बालकांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि आनंद खऱ्या अर्थाने या आपुलकीच्या स्नेह बंधन सोहळ्यात साजरा करतो हे आमचे भाग्य आहे. असे प्रतिपादन रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे यांनी केले.

तपोवन रोडवरील बाळासाहेब केदार विकास प्रतिष्ठान संचलित मतिमंद मुलांच्या निवासी शाळेत सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. ना.ज.पाऊलबुधे शैक्षणिक संकुलाच्या वतीने रक्षाबंधन कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.श्याम पंगा, डी.फार्मसी च्या प्राचार्य डॉ. अनुराधा चव्हाण, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप कांबळे, महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.सुचित्रा डावरे, बीएड कॉलेजच्या प्राचार्य डॉ.प्राची मचे,डीएड कॉलेजच्या प्राचार्य डॉ.सविता सानप सर्व सहाय्यक, सहयोगी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्य कांबळे यांनी आपल्या भाषणात बाळासाहेब केदार आणि त्यांच्या संपूर्ण टीमच्या कार्याचा विशेष गौरव केला. ते म्हणाले अत्यंत समर्पित भावनेने या निवासी शाळेची देखभाल आणि या मुलांचे संगोपन व शिक्षणाचे कार्य ही संस्था करत आहे कोणत्याही बाह्य मदतीवर किंवा सरकारी अनुदानावर अवलंबून न राहता या मुलांसाठी त्यांनी खऱ्या अर्थाने ही निवासी शाळा उभी केली. प्रेरणादायी आणि माणुसकीचा आदर्श यामधून दिसतो.असे ते म्हणाले. प्राचार्य डॉ.सविता सानप यांनी आपल्या भाषणात राखीचा धागा जात, धर्म, श्रीमंती- गरिबी या पलीकडे जाणारा आहे. इतिहासात हि राखीने माणुसकीचे बंध जोडले आहेत.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### प्रा. सुहास तोरडमल यांना पीएच.डी. प्रदान



अहिल्यानगर - येथील न्यू लॉ कॉलेजचे प्रा. सुहास तोरडमल यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्याकडून कायदेविषयक क्षेत्रात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. 'फौजदारी न्यायव्यवस्थेत अभियोजन पक्षाची महत्त्वपूर्ण भूमिका आणि महत्त्वाचे कार्य एक विश्लेषणात्मक अभ्यास' या विषयावर त्यांनी सखोल संशोधनाबद्दल पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. फौजदारी न्यायव्यवस्थेतील अभियोजनाची महत्त्वपूर्ण भूमिका, सार्वजनिक अभियोक्त्यांची कार्ये व जबाबदाऱ्या, न्यायप्रक्रियेत अभियोजनाचे योगदान तसेच प्रभावी, निष्पक्ष आणि न्याय्य फौजदारी न्यायव्यवस्था निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारणांचा या संशोधनातून सविस्तर मांडण्यात आले आहे. अभियोजन यंत्रणेच्या कार्यक्षमतेसमोरील विविध आव्हाने तसेच न्यायदान प्रक्रिया अधिक परिणामकारक करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचाही संशोधनात मांडण्यात आल्या आहे. प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे, संत गाडगे बाबा विद्यापीठ, अमरावतीच्या प्रा.डॉ. कल्पना जावळे, डॉ. उल्हास पाटील लॉ कॉलेज, जळगाव प्राचार्या डॉ. नयना नितीन महाजन यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सहसचिव मुकेश मुळे तसेच संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य,लॉ कॉलेजमधील सहकारी प्राध्यापक,विधिज्ञ, मित्र परिवाराने प्रा. तोरडमल यांचे अभिनंदन केले.

### ६ सप्टेंबर रोजी निमगाव वाघात रंगणार ग्रामीण मराठी साहित्याचा जागर!



अहिल्यानगर - स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त निमगाव वाघा (ता. नगर) येथे आठवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील साहित्यिक, कवी, लेखक, विचारवंत आणि साहित्यप्रेमी एकवटणार आहे.या साहित्य संमेलनाचे उद्घाटन शहर वाहतूक नियंत्रण शाखा, अहिल्यानगरचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे उपस्थित राहणार असून, त्यांच्या हस्ते सामाजिक, साहित्य, आरोग्य, शैक्षणिक, कला, क्रीडा, उद्योग आणि पर्यावरण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व कर्तृत्ववान कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी कवयित्री हेमलता गिते उपस्थित राहणार असून, साहित्यिक सीए डॉ. शंकर अंदानी हे संमेलनाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळणार असल्याची माहिती संयोजन समितीचे प्रमुख पै. नाना डोंगरे यांनी दिली. दि. ६ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या या साहित्य संमेलनाची सुरुवात गावातून निघणाऱ्या भव्य ग्रंथ दिंडीने होणार आहे. या ग्रंथ दिंडीत साहित्यिक, कवी, लेखक तसेच साहित्यप्रेमी सहभागी होणार आहेत. ग्रंथ दिंडीच्या माध्यमातून गावकऱ्यांमध्ये वाचन, साहित्य आणि पुस्तकांविषयीची आवड निर्माण करण्याचा संदेश दिला जाणार आहे. ग्रंथ दिंडीनंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत साहित्य संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. उद्घाटनानंतर दिवसभर विविध साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# स्नेहालयाच्या बालभवनातील बालिकांनी बांधल्या वकील बांधवांना राख्या

**न्यायालयात स्नेहबंधाची अनोखी वीण; रक्षाबंधनानिमित्त सेंट्रल ॲडव्होकेट बारमध्ये जपला बहीण-भावाचा स्नेहबंध**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रक्षाबंधनाच्या पवित्र सणाच्या पार्श्वभूमीवर बहीण-भावाच्या नात्यातील प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकी वृद्धिंगत करणारा अनोखा उपक्रम जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथील सेंट्रल ॲडव्होकेट बारमध्ये उत्साहात पार पडला. स्नेहालयाच्या मलाला व उत्कर्ष या दोन बालभवनांतील बालिकांनी सेंट्रल ॲडव्होकेट बारमध्ये उपस्थित राहून बारमधील वकील बांधवांना राख्या बांधल्या. या उपक्रमामुळे न्यायालयीन परिसरात स्नेह, माया आणि बहीण-भावाच्या नात्याची भावनिक वातावरण निर्माण झाले होते.

रक्षाबंधन हा केवळ राखी बांधण्याचा सण नसून परस्परांप्रती प्रेम, विश्वास, संरक्षण, जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्याचा दिवस आहे. याच भावनेतून स्नेहालयाच्या मलाला व उत्कर्ष बालभवनातील मुलींनी वकील बांधवांना राख्या बांधत सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा संदेश दिला. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या व्यक्तींमध्ये स्नेहाचे आणि आपुलकीचे नाते निर्माण व्हावे, तसेच समाजातील प्रत्येक घटकाने एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश होता.

बालिकांनी अत्यंत उत्साहाने व प्रेमाने तयार केलेल्या राख्या वकील बांधवांच्या मनगटावर बांधल्या. राखी बांधताना बालिकांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उपस्थित वकील बांधवांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधानाचे भाव या प्रसंगाचे विशेष आकर्षण ठरले. कायदेविषयक कामकाजासाठी नेहमी गंभीर वातावरण असलेल्या न्यायालयीन परिसरात या उपक्रमामुळे आपुलकीचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या प्रसंगी सेंट्रल ॲडव्होकेट बारचे अध्यक्ष ॲड. फारुक बी. शेख, उपाध्यक्ष ॲड. सौरभ काकडे, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. के. एम. देशपांडे, ॲड. बिहानी, ॲड. पिंगळे, ॲड. एस. जे. काकडे, सचिव ॲड. अभिजीत देशपांडे, महिला सचिव ॲड. मृणाली वाळुंज यांच्यासह बारमधील अनेक ज्युनिअर ॲडव्होकेट्स उपस्थित होते.

राखी बांधल्यानंतर उपस्थित बालिकांचा विशेष सन्मान करण्यात आला. सेंट्रल ॲडव्होकेट बारचे अध्यक्ष ॲड. फारुख शेख यांच्या वतीने तसेच ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. के. एम. देशपांडे यांच्या वतीने बालिकांना खाऊ व भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

# नगर शहरात पाव-लादी महागणार

**महागाईमुळे बेकरी व्यवसाय संकटात – दरवाढीचा निर्णय । १ सप्टेंबरपासून नवे दर लागू । बेकरी व्यवसायिकांची बैठक संपन्न**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वाढत्या महागाईमुळे पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ झाली असून वाहतूक खर्च वाढला आहे. तसेच बेकरी व्यवसायाला लागणारा कच्चा माल तेल, साखर, मैदा यांचे दर मोठ्या प्रमाणात वाढल्याने उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. त्यामुळे शहरातील बेकरी व्यवसाय संकटात आला असून दरवाढ करणे आवश्यक असल्याचे बेकरी असोसिएशनच्या वतीने सांगण्यात आले.

शहरातील बेकरी व्यावसायिकांची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत पाव लादीचे दर ४० रुपये करण्याचा निर्णय बेकरी असोसिएशनने घेतला आहे. ही दरवाढ येत्या १ सप्टेंबरपासून लागू होणार आहे.

यावेळी स्वराज बेकरीचे संचालक सलीम अन्सारी म्हणाले, गेल्या चार वर्षांपासून बेकरी उत्पादनांचे दर कायम आहेत. परंतु महागाईचा भडका मोठ्या प्रमाणात वाढल्याने साखर, तेल, मैदा यांचे दर वाढले आहेत. उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात होत असल्याने बेकरी व्यावसायिक संकटात आले आहेत. शहरातील बेकरी व्यावसायिकांनी एकत्र येऊन दरवाढ करण्याचे ठरवले आहे. उत्पादन खर्चातील वाढ लक्षात घेऊन पाव लादी होलसेल ४० रुपये आणि रिटेलसाठी ५० रुपये दराने ग्राहकांसाठी उपलब्ध केली जाणार आहे.

जेके बेकरीचे संचालक पारितोष शिंदे म्हणाले, बेकरी उत्पादनांची दरवाढ नाशिक, पुणे, बारामती अशा शहरांमध्ये यापूर्वीच करण्यात आली असून नगर शहरातही १ सप्टेंबरपासून ही दरवाढ लागू करण्यात येत आहे. याची सर्व ग्राहकांनी नोंद घ्यावी.

या बैठकीस स्वराज बेकरीचे सलीम अन्सारी, जेके बेकरीचे पारितोष शिंदे, सहारा बेकरीचे सलमान मलिक, फैजा बेकरीचे सादाब शेख, फाईव्ह स्टार बेकरीचे अन्सार अन्सारी, मिलन बेकरीचे सलीम शेख, फैसल शेख, जिशान अन्सारी, सादाब अन्सारी, मुमताज शेख आदी बेकरी व्यावसायिक उपस्थित होते.

# बिडकीनमध्ये ईद-ए-मिलादुन्नबीचा जुलूस उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने बिडकीन शहरात बुधवारी जुलूस उत्साहात व शांततेत पार पडला. सकाळी नुरानी मस्जिद येथून सुरुवात झालेल्या जुलूसने मदिना मस्जिद, सादत चौक, हवालदार गल्ली, बागवान गल्ली, ग्रामपंचायत व शेकटा फाटा मार्गे पुन्हा नुरानी मस्जिद गाठली.

जुलूसमध्ये नागरिक, तरुण व लहान मुलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. मार्गावर ठिकठिकाणी गोड भात, गोड शिरा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. ग्रामपंचायत सदस्य मिनाजभाई ईनामदार यांच्या वतीने सहभागी भाविकांना फेटे बांधण्यात आले. जुलूस शांततेत पार पडावा यासाठी बिडकीन पोलिस ठाण्याच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नुरानी मस्जिद व मदिना मस्जिद कमिटीच्या नियोजनातून कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# आर्य चाणक्यचा क्रीडाजागर; 'अमृत दौड'मध्ये विजेत्यांचा गौरव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त तसेच भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाईच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून आर्य चाणक्य विद्यामंदिरच्या वतीने संत ज्ञानेश्वर उद्यान येथे 'अमृत दौड' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी, शिक्षक, पालक, संस्थेचे पदाधिकारी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्पर्धेला चांगला प्रतिसाद दिला.

संचालक डॉ. राम लोंढे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सकाळी साडेसहा वाजता दौडला सुरुवात झाली. यावेळी स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष



डॉ. पद्मकुमार कासलीवाल यांच्यासह जुगलकिशोर लोहिया, विजय चाटुपळे, मनोज शुक्ल, अनिल कावसानकर, रेणुकादास गर्गे, चंद्रकांत कुलकर्णी, भास्कर कुलकर्णी, ज्योती जोशी आदी उपस्थित होते.

स्पर्धेत १८ वर्षांखालील मुले-मुली आणि १८ वर्षांवरील पुरुष-महिला असे गट करण्यात आले. पुरुष गटात आशुतोष पानगे प्रथम, अरविंद कामखेडकर द्वितीय तर अनिल कावसानकर तृतीय आले. महिला गटात साक्षी औटी प्रथम, उज्वला कुटे द्वितीय तर सोनाली कवडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थी-विद्यार्थिनी गटातील विजेत्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. नियमित चालणे व धावणे हे निरोगी जीवनासाठी आवश्यक असल्याचे डॉ. राम लोंढे यांनी यावेळी सांगितले. क्रीडा समितीच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे नियोजन करण्यात आले.

# एकदंत मित्र मंडळाच्या 'कांतारा इफेक्ट'ने मार्कंडेय मिरवणुकीत रंगली भूतकोला कला



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नारळी पौर्णिमेनिमित्त श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्टच्या वतीने दरवर्षी काढण्यात येणाऱ्या भव्य शोभायात्रेत यंदा श्री एकदंत गणेश मित्र मंडळ आणि शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानने सादर केलेल्या आगळ्यावेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. 'कांतारा' चित्रपटातून लोकप्रिय झालेल्या कर्नाटकातील पारंपरिक भूतकोला कलेचा प्रभाव असलेले वराह रूपम, गुलिगा देव आणि भूतकोला नृत्याचे सादरीकरण मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरले. दहा कलाकारांनी केलेल्या या सादरीकरणामुळे संपूर्ण शोभायात्रेला एक वेगळे, थरारक आणि अद्भुत रूप प्राप्त झाले.

श्री मार्कंडेय मंदिर, गांधी मैदान येथून सुरू झालेली ही शोभायात्रा चितळे रोड, चौपाटी कारंजा, दिल्ली गेट, गंगुबाई तालीम, नवरंग व्यायामशाळा, बागडपट्टी, पुणे मार्गे पुन्हा श्री मार्कंडेय मंदिर येथे दाखल झाली. मार्गातील प्रत्येक चौकात नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत होती. मात्र यंदाच्या मिरवणुकीत गर्दीला विशेष आकर्षित करणारे केंद्र ठरले ते श्री एकदंत गणेश मित्र मंडळ आणि शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी सादर केलेले भूतकोला नृत्य.

कर्नाटकातील पारंपरिक भूतकोला परंपरेत ज्या पद्धतीने कलाकार आकर्षक वेशभूषा, रंगभूषा आणि प्रभावी देहबोलीतून देवतांचे स्वरूप साकारतात, त्याच धाटणीचा अनुभव नगरकरांना या शोभायात्रेत मिळाला. मुख्य कलाकाराने साकारलेले वराहदेवाचे रूप विशेष लक्षवेधी ठरले, तर इतर कलाकारांनी गुलिगा देव, भूतकोला आणि अन्य पारंपरिक रूपे साकारत वातावरणात वेगळीच ऊर्जा निर्माण केली. त्यांच्या आगळ्या वेशभूषा, चेहऱ्यावरील रंगभूषा, हालचाली आणि नृत्याची लय पाहून नागरिक अक्षरशः थक्क झाले.

विशेष म्हणजे या सादरीकरणात 'कांतारा' चित्रपटाची आठवण करून देणारा प्रभाव जाणवत होता. कांतारामधील पारंपरिक लोककलेचा जो थरारक अनुभव प्रेक्षकांना जाणवतो, त्याच धाटणीचा 'कांतारा इफेक्ट' या मिरवणुकीत अनुभवायला मिळाला. कलाकारांच्या प्रवेशापासून त्यांच्या नृत्याच्या प्रत्येक हालचालीपर्यंत प्रेक्षकांच्या नजरा त्यांच्यावर खिळून राहिल्या. काही ठिकाणी अग्नितांडवाची झलक, आगीचे मोठे फवारे आणि प्रभावी सादरीकरणामुळे मिरवणुकीतील वातावरण अधिकच भारावून गेले.

श्री एकदंत गणेश मित्र मंडळ आणि शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी केवळ नृत्य सादर करून थांबण्याऐवजी संपूर्ण सादरीकरणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली. मोठ्या एलईडी स्क्रीनवर दक्षिण भारतातील पारंपरिक कला, विविध सांस्कृतिक कथानकांवर आधारित ॲनिमेशन आणि दृश्यफिती दाखवण्यात आल्या. त्यामुळे प्रत्यक्ष रस्त्यावर सुरू असलेल्या भूतकोला नृत्याला स्क्रीनवरील दृश्यांची साथ मिळून एक वेगळाच दृश्यानुभव निर्माण झाला. पारंपरिक कला आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा हा संगम शोभायात्रेतील एक नवा प्रयोग ठरला.

प्रत्येक चौकात भूतकोला नृत्य सुरू होताच नागरिकांची पावले आपोआप थांबत होती. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण या अनोख्या कलाविष्काराकडे उत्सुकतेने पाहत होते. कलाकारांच्या रूपाकडे पाहून काही जण आश्चर्यचकित होत होते, तर नृत्याच्या प्रत्येक टप्प्यावर टाळ्यांचा कडकडाट होत होता. अनेक नागरिकांनी मोबाईलमध्ये या सादरीकरणाचे चित्रीकरण केले. पारंपरिक लोककलेचा असा अनुभव अहिल्यानगरमध्ये पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळाल्याने नागरिकांमध्ये त्याची विशेष चर्चा रंगली.

या संपूर्ण उपक्रमामागे श्री एकदंत गणेश मित्र मंडळ आणि शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांची मोठी मेहनत होती. कलाकारांची निवड, वेशभूषा, रंगभूषा, सादरीकरणाची तयारी, एलईडी स्क्रीनची व्यवस्था, अग्नितांडवाचे नियोजन आणि मिरवणुकीतील प्रत्येक चौकात कार्यक्रम प्रभावीपणे सादर करण्यासाठी कार्यकर्त्यांनी अनेक दिवस परिश्रम घेतले.

या उपक्रमासाठी ऋषीकेश सामल, ओंकार बुरगुल, अमर सादुल, यश सामल, माधव उडता, रोहन सामल, वरद अन्नलदास, ओंकार अन्नलदास, कार्तिक गज्जम, शुभम कारामपुरी, महावीर कोंड्याल, साई सामल, आकाश हरबा, तनिष्क सिरसूल, शिवा कोंडा, गौरव कन्ना, विनीत इराबत्तीन, रितेश मेरगु, समर्थ बोडखे, अक्षय बुरला, विपुल आडेप, तनिष्क कोंडा, ईश्वर कैरमकोंडा, वेदांत देशपांडे, बालाजी श्रीराम, दर्शन कैरमकोंडा, संतोष उषाकोयल, श्रीकांत गज्जम आणि मयूर जाधव यांच्यासह महिला मंडळातील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. मिरवणुकीत हजारो नागरिक सहभागी होत असताना गर्दीचे नियोजन, कलाकारांना मार्ग उपलब्ध करून देणे आणि कार्यक्रम सुरळीत पार पाडणे यासाठीही कार्यकर्ते सातत्याने धावपळ करताना दिसत होते.

श्री एकदंत गणेश मित्र मंडळ आणि शिवराज्यकर्ते युवा प्रतिष्ठान यांची मिरवणुकीतील वेगळी ओळख यंदाही कायम राहिली. दरवर्षी काहीतरी नवीन, वेगळे आणि लक्षवेधी सांस्कृतिक सादरीकरण करण्याचा प्रयत्न या कार्यकर्त्यांकडून केला जातो.

**अशोकभाऊ फिरोदिया विद्यालयात**

# 'हेड बॉय-हेड गर्ल'चा पदग्रहण सोहळा उत्साहात




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनियर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी निवडण्यात आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधी ('हेड बॉय' व 'हेड गर्ल') यांचा पदग्रहण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यालयाच्या सभागृहात झालेल्या या सोहळ्यात नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींनी आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवून शिस्त, नेतृत्व आणि प्रामाणिकपणे कार्य करण्याची शपथ घेतली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया होत्या. सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या सल्लागार समितीच्या सदस्या सुनीता मुथा यांच्यासह प्राचार्य प्रभाकर भाबड, उपप्राचार्य कविता सुरतवाला, माध्यमिक विभाग प्रमुख वैशाली वाघ, प्राथमिक विभाग प्रमुख अर्चना मुंडीवाले, पूर्व-प्राथमिक विभाग प्रमुख ज्योती सुद्रिक यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे दिवंगत प्रमुख कार्यवाह स्व. अशोकभाऊ फिरोदिया व शांतीकुमारजी फिरोदिया यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. विद्यालयाच्या संगीत शिक्षिका रेणुका पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. पाहुण्यांचा परिचय प्रिया भळगट यांनी करुन दिला.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी हेड बॉय म्हणून संचित बारसे, हेडगर्ल समृद्धी नमन आणि असिस्टंट हेड बॉय अर्चित चोरबेले, असिस्टंट हेडगर्ल सई शेरकर यांची निवड करण्यात आली. विद्यार्थी प्रतिनिधींची निवड प्रक्रिया कोणत्या पद्धतीने पार पडली, याबाबत शिल्पा कमळकर यांनी उपस्थितांना माहिती दिली. निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पदग्रहण सोहळ्यास प्रारंभ झाला. प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधीचे नाव पुकारून त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या पदाची व जबाबदारीची माहिती राशीनकर सर यांनी दिली.

नवनिर्वाचित प्रतिनिधींना पदाची ओळख म्हणून शोल्डर पिन, लॅनयार्ड आणि नेमप्लेट प्रदान करण्यात आली. या क्षणी विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. आपल्या सहकाऱ्यांचे प्रतिनिधित्व करण्याची तसेच विद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये नेतृत्वाची भूमिका बजावण्याची जबाबदारी मिळाल्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

विद्यालयाचे क्रीडाशिक्षक प्रीतम जाधव व दिशान गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींनी पदाची शपथ घेतली. विद्यालयाची शिस्त, प्रतिष्ठा आणि मूल्ये जपत विद्यार्थ्यांसाठी आदर्श निर्माण करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रमुख अतिथी सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना शिस्तीचे महत्त्व समजावून सांगितले. आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देत त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. जीवनात यशस्वी होण्यासाठी शिस्त, सातत्य, मेहनत आणि जबाबदारीची भावना आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मैदानी खेळांच्या प्रात्यक्षिकांनी गजबजला प्रोफेसर कॉलनी चौक!

**अहिल्यानगरमध्ये क्रीडा संस्कृतीचा जागर; विविध खेळांच्या प्रात्यक्षिकांनी वेधले नागरिकांचे लक्ष । खेळातून शिस्त, आरोग्य अन् यशाची जिद्द निर्माण होते – आयुक्त यशवंत डांगे । हॉकीपासून मल्लखांब, तलवारबाजीपासून सायकलिंगपर्यंत... प्रोफेसर चौकात रंगला क्रीडोत्सव!**











**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** खेळांविषयी जनजागृती निर्माण होऊन क्रीडा संस्कृतीला चालना मिळावी, तसेच तरुण पिढीने मैदानी खेळांकडे वळावे, या उद्देशाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शनिवारी (दि. २९ ऑगस्ट) सावेडी येथील प्रोफेसर कॉलनी चौकात विविध खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सकाळपासूनच संपूर्ण रस्ता खेळाडूंनी गजबजून गेला होता. विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कौशल्याचे दर्शन घडविले. या उपक्रमामुळे परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर, जिल्हा ऑलिंपिक संघटना, एकविध खेळ संघटना आणि विविध क्रीडा मंडळे यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील विविध खेळांचे खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास तसेच ऑलिंपिकवीर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, नगरसेवक करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, सतीश शिंदे, मनोज दुल्लम, तसेच शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सुनील जाधव, कोमल वाकळे, मनीषा पुंडे आदी प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी राष्ट्रीय क्रीडा दिनाची पार्श्वभूमी विशद केली. क्रीडा संस्कृतीचे संवर्धन करण्याची जबाबदारी सर्व खेळाडूंची असल्याचे त्यांनी सांगितले. आपला देश कॉमनवेल्थ आणि ऑलिंपिकमध्ये पदके मिळविण्यासाठी यशस्वी वाटचाल करीत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. चंद्रकांत काळोखे यांनी ऑलिंपिकवीर मेजर ध्यानचंद यांचा जीवनपरिचय करून दिला. हॉकी या खेळासाठी मेजर ध्यानचंद यांनी दिलेल्या योगदानाची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

नगरसेवक करण कराळे म्हणाले की, आरोग्यासाठी मैदानी खेळ ही काळाची गरज बनली आहे. याबाबतची जनजागृती खेळाडूंच्या माध्यमातून होणार आहे. अहिल्यानगर शहरातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडावेत आणि त्यांनी देशासाठी पदके मिळवावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून खेळाकडे वळावे, असे आवाहनही कराळे यांनी केले. आपल्या आजोबांचे उदाहरण देताना ते म्हणाले की, वयाच्या ७८व्या वर्षीही ते निरोगी असून दररोज मैदानावर जाऊन व्यायाम करतात.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, खेळामुळे जीवनात शिस्त निर्माण होते आणि उत्तम आरोग्य लाभते. मानवी जीवन संघर्षमय असून, खेळामुळे अपयश पचविण्याची आणि पुन्हा प्रयत्न करून यशाच्या दिशेने वाटचाल करण्याची शिकवण मिळते. यशाची पायरी चढण्याची जिद्द खेळातून निर्माण होते. यासाठी पालकांनी आपल्या मुलांना मैदानी खेळांकडे वळवावे, असे आवाहन त्यांनी केले. खेळ केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता त्यातून करिअरही घडू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. माजी जिल्हा क्रीडा अधिकारी भाग्यश्री बिले यांचा पाठ्यपुस्तकात धडा आहे, याचा उल्लेख करत आयुक्त डांगे म्हणाले की, माणूस जीवंत असतानाच त्याचा पाठ्यपुस्तकात धडा येणे हे खेळाच्या माध्यमातून शक्य आहे. शहरात खेळाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून नेहमीच प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाची सुरुवात झुंबा नृत्याने झाली. त्यानंतर हॉकीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. पुरलेला मल्लखांब आणि रोप मल्लखांबच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या हृदयाचा ठोका चुकविला. मल्लखांबपटूंनी सादर केलेल्या विविध कसरतींना उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. यानंतर सायकलिंग, स्केटिंग, रायफल शूटिंग, तलवारबाजी, व्हॉलीबॉल, ज्युदो, कुस्ती, बॉक्सिंग आणि खो–खो या विविध क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. विविध खेळांतील खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केल्याने उपस्थित पालक आणि नागरिकांनी या उपक्रमाचा आनंद घेतला.

विविध क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके पाहण्यासाठी पालकांसह नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. सकाळच्या वेळेत प्रोफेसर कॉलनी चौक परिसरात खेळाडू, प्रशिक्षक, पालक आणि नागरिकांची मोठी उपस्थिती दिसून आली. त्यामुळे संपूर्ण परिसराला क्रीडोत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते. दरम्यान, इन्फिनिटी सायक्लोथॉन, अहिल्यानगर, बाईक टेक पॉइंट आणि सायकलिंग असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना सायकल भेट देण्यात आली. क्रीडा दिनाच्या निमित्ताने सायकलिंगला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी जलतरण संघटनेचे रावसाहेब बाबर, ऑलिंपिक संघटनेचे शैलेश गवळी, जिल्हा क्रीडा कार्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, प्रवीण कोंढावळे, श्री समर्थ प्रशाळेच्या प्राचार्य वसुधा जोशी, क्रीडा शिक्षक लोंढे सर, आसिफ शेख, नंदेश शिंदे, कुलकर्णी सर, प्रा. संजय साठे, सुदर्शन कोतकर, भापकर, सुनील गोडळकर, आदित्य धोपावकर, निलेश मदने, गणेश वारुळे, रामेश्वर चेमटे, विकास परदेशी, शकील शेख, मोहनीराज लहाडे, अल्ताफ कडकाले,क्रीडा भारतीचे वेदपाल सर, सुधीर चपळगावकर, ऋषिकेश दरंदले, प्रसाद पाटोळे, श्रीरंग कुलकर्णी आणि संजय धोपावकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रावसाहेब बाबर यांनी केले.

## अहिल्यानगर– मुंबई अंतर होणार कमी! ‘जनकल्याण’ महामार्गामुळे मुंबई फक्त तीन तासांवर

**टाकळी ढोकेश्वर चास परिसरातील मार्गाचा नकाशा समोर; सहापदरी द्रुतगती महामार्गामुळे विकासाला मिळणार वेग**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यासह मराठवाडा आणि मुंबई यांच्यातील दळणवळणाला नवी दिशा देणाऱ्या कल्याणलातूर ‘जनकल्याण द्रुतगती महामार्गा’च्या प्रकल्पाला वेग आला आहे. नगर ते मुंबई प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी करण्याच्या उद्देशाने प्रस्तावित असलेल्या या महामार्गाचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण सुरू असून, गावनिहाय मार्गरेषा आणि नकाशे तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

टाकळी ढोकेश्वर आणि चास परिसरातून जाणाऱ्या प्रस्तावित मार्गाचा नकाशा समोर येत असल्याने या भागातील नागरिकांच्या आशा उंचावल्या आहेत. महामार्गाची उभारणी झाल्यानंतर या परिसराच्या विकासाला मोठी चालना मिळण्याची शक्यता असून, मुंबईशी असलेले अंतर आणि प्रवासाचा वेळ दोन्ही मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत.

सुमारे ४४२ किलोमीटर लांबीचा सहापदरी द्रुतगती महामार्ग प्रस्तावित असून, गेल्या दीड महिन्यापासून ड्रोनच्या माध्यमातून सर्वेक्षण सुरू आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर गावनिहाय जमीन आणि मार्ग निश्चित करून जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. या महामार्गावर माळशेज घाट परिसरात सुमारे आठ किलोमीटर लांबीचा अत्याधुनिक बोगदा प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे ३५ ते ३६ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, महामार्ग पूर्ण झाल्यानंतर अहिल्यानगर, मुंबई आणि मराठवाड्यातील प्रवास अधिक वेगवान होण्याबरोबरच व्यापार, उद्योग, शेतीमाल वाहतूक आणि रोजगाराच्या संधींनाही चालना मिळण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, टाकळी ढोकेश्वरचास परिसरातून जाणारा प्रस्तावित मार्ग या भागासाठी विकासाचे नवे दार उघडणारा




ठरू शकतो. महामार्गाच्या आसपास नवीन बाजारपेठा, व्यावसायिक केंद्रे, लॉजिस्टिक सुविधा आणि इतर पायाभूत सुविधा विकसित होण्याची शक्यता असल्याने आगामी काळात या परिसराचे महत्त्व वाढणार आहे.

मात्र प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्यासाठी अजून १५ ते १८ महिन्यांचा कालावधी लागू शकतो. सध्या सुरू असलेले सर्वेक्षण आणि नकाशे तयार करण्याचे काम या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. ‘जनकल्याण’ महामार्ग प्रत्यक्षात आल्यास अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासाला वेग मिळण्यासोबतच मुंबईशी असलेले अंतर अक्षरशः कमी झाल्याचा अनुभव नागरिकांना येणार आहे.

## रक्षाबंधनाच्या शुभमुहूर्तावर पारनेर शहरातील विकासकामांना गती; प्रभाग ७ व ११ मध्ये विविध कामांचे भूमिपूजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** रक्षाबंधनाच्या पवित्र व शुभमुहूर्तावर पारनेर शहरातील प्रभाग क्रमांक ७ व ११ मधील विविध विकासकामांना प्रत्यक्ष सुरुवात झाली. पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते या विविध विकासकामांचे भूमिपूजन समारंभ उत्साहात संपन्न झाले.

या विकासकामांमध्ये कान्हूर रोड ते शिवाजी रोड मुख्य रस्त्याचे डांबरीकरण, कानिफनाथ मंदिर ते बापू शिंदे घरापर्यंत ड्रेनेज लाईन व रस्ता काँक्रिटीकरण तसेच मिलन चौक ते मनकर्णिका नदी ड्रेनेज लाईन आदी कामांचा समावेश आहे. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन समस्या दूर करून रस्ते व मूलभूत नागरी सुविधांना अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने ही कामे महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार काशिनाथ दाते सर यांनी पारनेर शहराच्या विकासासाठी नागरिकांच्या मागण्या आणि स्थानिक प्रश्नांना प्राधान्य देऊन आवश्यक त्या सर्वच कामांना टप्प्याटप्प्याने गती दिली जाईल. रस्ते, ड्रेनेज व इतर मूलभूत सुविधांच्या माध्यमातून शहर अधिक सुस्थितीत आणि नागरिकांसाठी



**पारनेर शहरातील प्रभाग क्रमांक ७ व ११ मधील नागरिकांच्या अनेक दिवसांच्या मागण्यांना आज प्रत्यक्ष विकासकामांच्या माध्यमातून मूर्त स्वरूप मिळत आहे. रस्ते, ड्रेनेज आणि काँक्रिटीकरणाची ही कामे नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी दूर करण्यासाठी निश्चितच महत्त्वाची ठरणार आहेत. आमदार काशिनाथ दाते सरांनी नागरिकांच्या मागण्यांची दखल घेऊन निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. यापुढेही पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही एकजुटीने प्रयत्नशील राहू.**

**सौ. कविता औटी, शहराध्यक्षा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पारनेर**

सोयीचे करण्याचा आपला प्रयत्न राहील, असा विश्वास व्यक्त केला.

या प्रसंगी जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत दादा गायकवाड, राहुल पाटील शिंदे, वसंतराव चेडे, उद्योजक दिलीप शेठ दाते, नगरसेवक कांतीलाल ठाणगे, अशोकराव चेडे, पारनेर राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष राजूशेठ औटी, महीलाध्यक्षा कविता औटी, उपाध्यक्ष सुनील गाडगे, उद्योजक विठ्ठल कावरे, माऊली औटी, वडनेर हवेलीचे सरपंच लहू भालेकर, दिगंबर पुजारी, सोनाबाई चौधरी, सुनीता सोबले, प्रमिला चेडे, रेखा चेडे, अनुराधा पवळे, ऋतुजा औटी, प्रियंका औटी, कविता औटी, उषा झंजाड, निलम गोसावी, राणी सोबले, उज्वला शेरकर, गायत्री सोनवणे आदी मान्यवरांसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोहम्मद जयंतीनिमित्त पैठणमध्ये १६० जणांचे रक्तदान

**युथ मूव्हमेंट व जमाते इस्लामी हिंदचा उपक्रम; खासदार–आमदारांची शिबिरास भेट**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–**प्रेषित मोहम्मद (स.) यांच्या जयंतीनिमित्त युथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्र, पैठण युनिट, जमाते इस्लामी हिंद पैठण तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने बुधवारी (२६) पैठण येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत जवळपास १६० जणांनी रक्तदान केले. गरजू व आजारी रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे, या सामाजिक भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात तरुणांचा सहभाग लक्षणीय होता. यावेळी खासदार संदिपान भुमरे व आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी शिबिरास भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले.



युथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्रच्या वतीने दरवर्षी राज्यभर रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते. मागील वर्षी राज्यात आठ हजारांहून अधिक नागरिकांनी रक्तदान केल्याची माहिती आयोजकांनी दिली. सामाजिक कार्याची दखल घेत उपमुख्यमंत्र्यांकडून युथ मूव्हमेंट महाराष्ट्रला प्रशस्तीपत्र देण्यात आल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

जयंतीनिमित्त पैठण येथील विविध रुग्णालयांमध्ये रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. तसेच प्रेषित मोहम्मद (स.) यांच्या जीवनकार्याची माहिती देणाऱ्या पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

## ढोकेश्वर विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिवस व रक्षाबंधन उत्साहात साजरा

**खेळ खेळाडूंना अपयशानंतर उभे राहायला शिकवतो: प्राचार्य बाळासाहेब खिलारी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** देशाच्या प्रत्येक खेळाडूची मेहनत आणि जिद्द लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. हा दिवस साजरा करण्याचा हेतू म्हणजे तरुणांमध्ये खेळाची आवड निर्माण करणे, आरोग्य आणि तंदुरुस्ती बद्दल जागरुकता वाढवणे आणि खेळाडूंच्या योगदानाचा सन्मान करणे हा आहे. तसेच खेळ हा माणसाला फक्त जिंकायला नाही तर पडल्यावर किंवा हरल्यावर उभे राहायला शिकवतो असे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला त्या प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून प्राचार्य बाळासाहेब खिलारी बोलत होते. ते पुढे बोलताना म्हणाले की प्रत्येकाने समाजातील प्रत्येक स्त्री ला आपली आई किंवा बहीण या रूपात पाहिल्यास आणि भारतीय संस्कृती अंगीकारल्यास



समाजात घडणारे अनिष्ट प्रकार नक्कीच थांबतील.

या प्रसंगी पुण्याहून आलेले प्रा. भरत राठोड सर यांनी विद्यार्थ्यांना १० वी १२ वी नंतर होणाऱ्या विविध क्षेत्रातील बहुपर्यायी परीक्षा पद्धती यावर मार्गदर्शन केले. सर्व महिला शिक्षिका यांनी वृक्षाला राख्या बांधून वृक्ष संवर्धन करण्याचा संदेश दिला. तसेच विद्यालयाच्या आरो वॉटर प्युरिफिकेशन सिस्टिम साठी भाऊसाहेब खरात व शंकर पावडे यांनी प्रत्येकी २१०० दिले तर पाचवी अ ची विद्यार्थिनी श्रुती संभाजी मेहेर हिने वाढदिवसाच्या निमित्ताने १००० दिले.

यावेळी रवींद्र मते, कल्पना जाधव, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी देखील विद्यार्थ्यांना रक्षाबंधन व खेळाचे महत्व सांगितले. यावेळी श्रीरंग धामणे, संदीप महांडुळे, नारायण शेळके, वैशाली गायखे, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे, सुरेखा ठाणगे,सोनल रोहकले, वर्षा भोंडवे, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, सोनाली माळवदे, स्वाती भालेकर, साक्षी ससाणे, संतोष अडसूळ, सुदेश मुंडे, प्रणय ढुस, प्रिया नसवाले, करुणा जाधव, निलम झावरे, शिरीष राऊत, पवन कुटे, अनुष्का कांबळे, अमोल गोरे, नारायण हरेल, सुनीता घोडके, इत्यादी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले तर आभार बाबासाहेब जाधव यांनी मानले.

**आज ग्रामीण भागातील खेळाडू तयार होणे कठीण झाले आहे. मोठी रक्कम भरून क्लब ला शहरात पाठवणे बहुजनांच्या विद्यार्थ्यांना शक्य नाही. अनेक माध्यमिक विद्यालयात क्रीडा शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत त्यामुळे शासनाने या जागा त्वरित भराव्यात.**

**- पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, ढोकेश्वर विद्यालय.**